## मेक इन इंडिया अंतगर्त बनविलेल्या पहिल्या ॲल्युमिनियम बॉडी मेट्रो ट्रेनचे टिटागढ वॅगन लि. फॅक्टरी कोलकाता येथून अनावरण

पुणे मेट्रोला पीसीएमसी ते स्वारगेट आणि वनाझ ते रामवाडी असे दोन मार्ग आहेत. या 33.2 किमी मार्गावर 25 उन्नत आणि 5 भूमिगत स्थानके आहेत. पीसीएमसी ते फुगेवाडी आणि वनाज ते गरवारे कॉलेज हा १२ किमीचा मार्ग नागरिकांसाठी नुकताच खुला करण्यात आला आहे.

पुणे मेट्रोने M/S टिटागढ वॅगन लि. इंडिया आणि M/S TFA इटली यांच्या कन्सोर्टियमद्वारे निर्मित तीन मेट्रो कार संचांसह (एकूण 102 कार) 34 मेट्रो रेल्वे गाड्यांसाठी ऑर्डर दिली आहे. पहिल्या दोन गाड्या TFA इटली येथून आधीच आल्या आहेत आणि उर्वरित मेट्रो गाड्या कोलकात्याच्या टिटागढ वॅगन लि. कारखान्यात भारतात तयार केल्या जात आहेत.

आज, 26 मार्च 2022 रोजी टिटागड वॅगन लि. कोलकाता कारखान्यातून पहिल्या मेक इन इंडिया ॲल्युमिनियम बॉडी मेट्रो ट्रेनला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. 6 मार्च 2022, माननीय पंतप्रधान, भारत यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर पुणे मेट्रोमध्ये महसूल सेवेत पहिली ट्रेन सुरू करण्यात आली.

भारतात प्रथमच ॲल्युमिनियम कार बॉडी मेट्रो कार तयार केल्या जात आहेत, हि भारत सरकारच्या मेक इन इंडिया धोरणासाठी एक झेप आहे असे म्हणायला हरकत नाही. हा देशातील सर्वात हलका मेट्रो कोच आहे, तो पारंपारिक स्टेनलेस स्टीलच्या डब्यांपेक्षा 6.5% हलका आहे, त्यामुळे हे डबे ऊर्जा कार्यक्षम आणि टिकाऊ आहेत. अॅल्युमिनियम कार बॉडी असल्याने, कोचचे आयुष्य जास्त असते आणि त्याची देखभाल खूप कमी असते.

3 कार कंपोझिशनमध्ये एकूण प्रवासी वाहून नेण्याची क्षमता अंदाजे 978 आहे (ड्रायव्हिंग मोटर कार-315, ट्रेलर कार-348] आणि आसन क्षमता 140 आहे [ड्रायव्हिंग मोटर कार-44, ट्रेलर कार-52 (2 व्हील चेअर्स सह)] मेट्रो ट्रेनचा अधिकतम वेग ९० किमी आहे. ट्रेनच्या एका कोचची लांबी २९ मी, उंची ११.३० मी. आणि रुंदी २.९ मी. आहे.

या मेक इन इंडिया कोचमध्ये अँटी-ड्रॅगिंग वैशिष्ट्य आहे जे भारतातील मेट्रो ट्रेनमध्ये प्रथमच लागू केले गेले आहे. हे ड्रॅगिंग वैशिष्ट्य कपडे, पट्टे इत्यादीसारख्या पातळ वस्तू शोधण्यास सक्षम करते. यात अडथळे शोधण्याच्या वैशिष्ट्यासह सुसज्ज द्वि-विभाजित दरवाजे आहेत. आणि ट्रेनच्या प्रत्येक टोकाला समोरील आपत्कालीन निर्वासन दरवाजा आहे. डबे आर्द्रता नियंत्रणासह पूर्णपणे वातानुकूलित आहेत. प्रत्येक कारमध्ये 45 KW चे 2 HVAC युनिट्स आहेत. 30% पेक्षा जास्त ऊर्जा पुनरुत्पादनासह 66% पॉवरिंगसह, यात 70 किमी प्रतितास ते 10 किमी प्रतितास या वेगाने पुनरुत्पादक ब्रेकिंग आहे.

डब्यात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पॅनिक बटण सारखी प्रवासी सुरक्षा वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येक मेट्रो कारमध्ये कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत प्रवासी थेट ड्रायव्हरशी संवाद साधू शकतात. मेट्रो ट्रेनमध्ये 98% सीसीटीव्ही कव्हरेज आहे. प्रवाशी प्रवासासाठी चढल्यानंतर सर्व दरवाजे बंद आणि लॉक झाल्यावरच ट्रेन पुढे जाईल. कोणत्याही ट्रेनचे विभाजन झाल्यास चालत्या ट्रेनमध्ये आपत्कालीन ब्रेक ॲप्लिकेशन देखील आहे. सारांश, हे डबे जागतिक दर्जाच्या प्रवासी सुरक्षा वैशिष्ट्यांनी सुसज्ज आहेत.

कोचमध्ये मोबाईल चार्जिंग पॉईंट, स्थानकांच्या नावांसाठी आवाज घोषणा, ट्रेनमध्ये प्रवाशांच्या अखंड हालचालीसाठी गाड्या एकमेकांशी जोडणारा विस्तीर्ण गँगवे, ट्रेनमध्ये पुढील आणि मेट्रोच्या आत दोन्ही बाजूला असलेले डिजिटल संकेतक, उभ्या प्रवाशांच्या आधारासाठी खांब आणि पकडण्यासाठी हँडल, 2 क्र. ट्रेलर कार मध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी व्हीलचेअरसाठी जागा अशी इतर वैशिष्ट्ये व सुविधा आहेत.

यात महिलांसाठी "नारी शक्ती-स्त्री शक्ती" या वाक्याने चिन्हांकित केलेला एक संपूर्ण डबा आहे, जो फक्त महिला प्रवाशांना समर्पित आहे. ही मेट्रो ट्रेन मेक इन इंडियाच्या तरतुदींचे पालन करते आणि 60-65% उपकरणे आणि वस्तू भारतीय उत्पादक आणि विक्रेत्यांकडून मिळवल्या जातात.

या कार्यक्रमास गृह निर्माण व नगर विकास सचिव, आणि अध्यक्ष महा मेट्रो श्री. मनोज जोशी, महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ ब्रिजेश दीक्षित, विशेष कार्य अधिकारी, केंद्रीय गृह निर्माण आणि नगर विकास मंत्रालय श्री जयदीप आणि टिटागड वॅगन्सचे चेयरमन श्री जे पी चौधरी आणि व्यवस्थापकीय संचालक श्री उमेश चौधरी हे उपस्थित होते

**गृह निर्माण व नगर विकास सचिव, आणि अध्यक्ष महा मेट्रो श्री. मनोज जोशी**: सचिव कार्यक्रमात बोलताना, महुआ सचिव श्री मनोज जोशी यांनी देशातील पहिल्या ऍल्युमिनियम ट्रेनच्या निर्मितीकरता टिटागड वॅगन्सचे अभिनंदन केले. देशातील मेट्रो प्रकल्पांमुळे एक नवीन इको-सिस्टीम निर्मित होत असून या आधी १० वर्षांपूर्वी याचा साधा विचार करणे देखील शक्य नसल्याचे ते म्हणाले. या क्षेत्रात गुंतवणूक करणे हि देखील एक मोठी रिक होती आणि ती टिटागड वॅगन्ने घेतल्या बद्दल त्यांनी त्यांचे कौतुक केले. अश्या प्रकारच्या ऍल्युमिनियम कोचच्या निर्मितीमुळे यापुढे `मेक इन इंडिया' चे स्वप्न साकार होत असल्याचे देखील श्री जोशी म्हणाले. एकीकडे हि एक अभिमानाची बाब असताना, दुसरीकडे याची गुणवत्ता आणि रख-रखाव एक मोठे आवाहन असल्याचे देखील श्री मनोज जोशी म्हणाले. महा मेट्रोने ऍल्युमिनियम कोच ला प्राधान्य दिल्याबद्दल त्यांनी महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ दीक्षित यांचे अभिनंदन केले.

**महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ ब्रिजेश दीक्षित**: अश्या प्रकारे वजनाने कमी असलेला मेट्रोच्या कोच चे निर्माण होणे आणि त्याचा मेट्रो प्रकल्प करता वापर होणे हि संपूर्ण देशाकरता अतिशय अभिमानाची बाब असल्याचे महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ ब्रिजेश दीक्षित आपल्या भाषणात म्हणाले. या संपूर्ण कोचचे डिजाईन देशात झाले आहे. २०१६ मध्ये पुणे मेट्रो प्रकल्प सुरु झाला तेव्हा देशात मेट्रो कोच निर्माण करणारी एकही कंपनी नव्हती याकडे लक्ष वेधत आज देशात अश्या प्रकारे कोच निर्माण होणारी कंपनी असून आता कोचचे निर्माण देशात होत आहे हि एक अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले. ऍल्युमिनियम कोचचे निर्माण हे पुणे प्रकल्पाकरिता अतिशय महत्वाचे ठरणार असल्याचे ते म्हणाले. पुणे मेट्रो प्रकल्पाच्या दोन मार्गिकांवर प्रवासी सेवा सुरु झाली असून उर्वरित प्रकल्प येत्या एका वर्षात सुरु करण्याचा महा मेट्रोचा मानस असल्याचे ते म्हणाले. ऍल्युमिनियम कोच ची निर्माण प्रक्रिया हि अतिशय आवाहनात्मक असल्याचे सांगत या सर्व प्रश्नांवर मात करत आणि सोबतच किंमत कमी करत आज पहिले ऍल्युमिनियम कोचचे मेट्रो प्रकल्पाकरिता उपयोग होणे हा एक महत्वाचा टप्पा महा मेट्रोने गाठल्याचे ते म्हणाले. या नवनिर्मित ऍल्युमिनियम कोचचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे यात वापरलेले अनेक सुटे भाग देशात निर्माण झाले आहेत. महा मेट्रोने आजवर या सारखे अनेक अनोखे आणि महत्वाचे विषय हाताळले आहेत. यात 5D BIM, सौर ऊर्जेचा मोठ्या प्रमाणात होत असलेला वापर सारख्या बाबींचा समावेश आहे. महा मेट्रोच्या एकूणच प्रकल्प उभारणीत राज्य सरकारचे मोठे सहकार्य लाभल्याचे ते म्हणाले.

**विशेष कार्य अधिकारी, केंद्रीय गृह निर्माण आणि नगर विकास मंत्रालय श्री जयदीप**: आत्मनिर्भर भारताची संकल्पना साकार कारताना आजचा दिवस एक महत्वाचे पाउल असल्याचे आपल्या भाषणात श्री जयदीप म्हणाले. मास रॅपिड ट्रान्सीट सिस्टीम करता अश्या प्रकारचे कोच चा वापर होणे ही एक महत्वाची बाब असून त्या करता महा मेट्रोचे अभिनंदन करतो असे ते म्हणाले.

या सोहळ्यात टिटागड वॅगन्सचे चेयरमन श्री जे पी चौधरी आणि व्यवस्थापकीय संचालक श्री उमेश चौधरीयांनी देखील कंपनीच्या एकूम कामाचा आणि या प्रकल्पाचा उल्लेख आपल्या भाषणात केला.